**सत्र खटला १३७/२०२५**
सरकार वि. सनी श्रृंगारे
**<u>निशाणी क्र.०८</u>**

सरकारपक्षातर्फे **साक्षीदार क्र. ०१** ची साक्ष:
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की:

माझे नांव :— **शुभम सुभाष महाजन**
वय सुमारे :— ३९ वर्षे, व्यवसाय :— वैशाली हॉटेल, मालक
राहणार :— रूंदावन नगर, मुर्तिजापुर, जि. अकोला.

**<u>सरकारपक्षातर्फे सरतपासणी सरकारी वकील श्री. आर.एस.रेलकर यांचेवतीने</u> :—**

**०१.** माझे अमरावती अकोला रस्त्यावर मुर्तिजापुर येथे प्रतिक नगरच्या बाजुला वैशाली नावाचे हॉटेल आहे. तसेच त्या रोडवर व्यास नावाचे देखील हॉटेल आहे. मनोज व्यास हे व्यास हॉटेलचे मालक आहेत. मी व मनोज व्यास यांनी मिळुन प्रतिक नगर येथे गजानन महाराजांच्या मंदीराच्या पाठीमागे मजुरांना राहण्याकरीता दोघा मिळुन एक घर घेतले होते. त्याठिकाणी माझे हॉटेलचे सर्व मजुर राहत होते. मजुर सचिन गुल्हाने, राजु शिरभाते व लेखराज सोनी हे त्या घरी राहत होते. ते रात्री १२.०० वाजता झोपण्याकरीता त्या घरी येत होते व दुपारी १२.०० वाजता हॉटेलवर कामाकरीता निघुन जात होते. ते हॉटेलमधुन घरी पायी जात होते. मी सनि उर्फ चेतन श्रृंगारे याला ओळखतो. तो यवतमाळ जिल्हयातील हरसुल येथील राहणारा आहे. तो घटनेच्या सात ते आठ महीन्यापुर्वी आमच्या हॉटलेवर काम करून गेला होता. तो आज न्यायालयात हजर आहे. तो दि.२१.०७.२०२४ रोजी पुन्हा माझ्याकडे काम मागण्याकरीता आला होता. तो त्याच्या गर्लफ्रेन्डसोबत आला असे त्याने मला सांगितले व कामावर ठेवण्यासाठी विनंती केली. तो तब्येत ठिक नसल्याने दोन ते तीन दिवसानंतर कामावर येतो असे म्हणाला. परंतु तो कामावर आला नाही.

**०२.** दि. २३.०७.२०२४ रोजी रात्री हॉटेल बंद झाल्यानंतर मी दोन मजुरांना सोडण्याकरीता त्या घरी गेलो. त्यामध्ये सुरेंद्र वरघट व सुबोध वरघट हे मजुर होते. मी त्यांना रात्री २.०० ते ३.०० वाजण्याच्या सुमारास सोडण्यास गेलो त्यामुळे तारीख २४.०७.२०२४ अशी लागली होती. मी त्यांना रूममध्ये सोडले व सनी कामावर कधीपासुन येतोय हे विचारण्याकरीता त्याच्या खोलीकडे गेलो. त्यावेळी घरामध्ये त्याचे रूममध्ये एक मुलगी जमीनीवर रक्ताच्या थारोळ्यात पडलेली होती. भिंतीवर रक्ताचे डाग होते. मी सदर घटना मोबाईलच्या टॉर्चने बघितली. त्यावेळी सनी त्याठिकाणी हजर नव्हता. मी ईतर मजुरांना आवाज देउन

उठविले. मी त्याठिकाणी घाबरलो असल्याने व मला बरे वाटत नसल्याने मी थोडावेळ बाजुला थांबलो व नंतर घरी गेलो. त्यानंतर मी सकाळी अंदाजे ८.०० ते ८.३० वाजताचे सुमारास मी मुर्तिजापुर पो.ठाणे येथे गेलो व घटनेची फिर्याद दिली. पोलीसांनी मी सांगितल्याप्रमाणे माझी रिपोर्ट लिहीली. आता मला दि. २४.०६.२०२४ ची रिपोर्ट दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर असुन त्यास **नि.क्र.०९** देण्यात येते. आता मला एफआयआरची छापील प्रत दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर असुन त्यास **नि.क्र.१०** देण्यात येते.

**०३.** पोलीस तपासादरम्यान घटनास्थळी आले होते. पोलीसांनी पंचनामा केला. पोलीसांनी माझा जवाब नोंदविला होता. तपासी अधिकारी यांनी मला न्यायदंडाधिकारी मुर्तिजापुर यांचेकडे नेले होते. माझा न्यायदंडाधिकारी यांनी मी सांगितल्याप्रमाणे जवाब नोंदविला. आता मला दि. ११.०७.२०२५ चा माझा न्यायदंडाधिकारी यांनी नोंदविलेला जवाब मला दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर असुन त्यास **नि.क्र.११** देण्यात येते.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे</u> :—**

**(आरोपीचे वकील गैरहजर. आरोपीला विचारले असता त्याने साक्षीदाराला कुठलेही प्रश्न विचारायचे नाही असे सांगितले. त्यामुळे उलटतपास काही नाही).**

समक्ष,
श्रवणोत्तर स्वीकृत,

**स्वा/—**
(राहुल अ. शिंदे)
जिल्हा न्यायाधीश—३, अकोला.

दिनांकः— ०१.०४.२०२६
अकोला.